**विकास योजनेतील प्रस्तावित रस्त्यांची जागेवर आखणी करणेबाबत.**
**महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम १५४ अन्वये निदेश.**

**महाराष्ट्र शासन**
**नगर विकास विभाग,**
**मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.**
**शासन निर्णय क्रमांक : टिपीएस-१८१८/प्र.क्र.२१३/१८/नवि-१३**
**दिनांक :२० ऑगस्ट, २०१८.**

राज्यातील नियोजन प्राधिकरणांनी त्यांच्या कार्यक्षेत्रासाठी महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ मधील तरतूदीनुसार विकास योजना तयार करणे तसेच त्या वेळोवेळी उक्त अधिनियमातील तरतूदीनुसार सुधारीत करणे बंधनकारक आहे. अशा विकास योजना तयार करतेवेळी / सुधारीत करतेवेळी त्यामध्ये नव्याने विकास योजना रस्ते दर्शविण्यात येतात. विकास योजना नकाशातील रस्ते प्रत्यक्ष जागेवर आखणी करण्यात न आल्यामुळे त्यामध्ये भूखंडाची खरेदी विक्री होवुन नागरीकांची फसवणुक होवु शकते तसेच विकास योजना रस्त्याच्या ठिकाणी अनधिकृत बांधकामे होवुन रस्त्याचे विकसनास भविष्यात अडथळे निर्माण होतात. या बाबी टाळण्यासाठी राज्यातील सर्व महानगरपालिका तसेच महानगर प्रदेशाच्या मंजूर विकास योजनेतील विकास योजना रस्त्याची आखणी प्रत्यक्ष जागेवर दर्शविणे आवश्यक असल्याचे शासनाचे मत झाले आहे. सबब, यास अनुसरुन राज्यातील सर्व महानगरपालिका तसेच महानगर प्रदेश विकास प्राधिकरणांना महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम १५४ अन्वये खालील प्रमाणे निदेश देण्यात येत आहेत.

*"निदेश*

*राज्यातील महानगरपालिका तसेच महानगर प्रदेश विकास प्राधिकरणांनी त्यांच्या कार्यक्षेत्रातील मंजूर विकास योजना / प्रादेशिक योजनेतील रस्त्याची आखणी प्रत्यक्ष जागेवर करणे बंधनकारक आहे. याबाबतची कार्यवाही तातडीने पुर्ण करण्यात यावी. संबंधित पदनिर्देशीत अधिकारी / प्रभाग अधिकाऱ्यांनी अशा सर्व रस्त्यांच्या जागांवर अतिक्रमणे / अनधिकृत विकास होणार नाही याबाबत दक्षता घ्यावी".*

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

URBAN DEVELOPMENT DEPTT. ★ MANTRALAYA, MUMBAI-32 सत्यमेव जयते

(रा.म.पवार)
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत माहितीसाठी:-**
१) मा.मुख्यमंत्री यांचे सचिव.
२) मा.राज्यमंत्री (नवि) यांचे खाजगी सचिव.
३) प्रधान सचिव (नवि-१) नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
४) प्रधान सचिव (नवि-२) नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.

प्रति,

५) संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे.

/-त्यांना विनंती करण्यात येते की, सदरचे निदेश नगर रचना संचालनालयाच्या www.dtp.maharashtra.gov.in या वेबसाइटवर प्रसिद्ध करावेत तसेच त्याच्या प्रती राज्यातील महानगरपालिका तसेच महानगर प्रदेश विकास प्राधिकरणांना पाठवून देण्यात याव्यात.

६) संचालक तथा सह सचिव (नगर रचना), नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.

७) आयुक्त, सर्व महानगरपालिका.

८) व्यवस्थापकीय संचालक, सिडको ,निर्मल बिल्डींग ,मुंबई.

९) मुख्य कार्यकारी अधिकारी, महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, मुंबई / पुणे / नागपूर / नाशिक / औरंगाबाद.

१०) मुख्य कार्यकारी अधिकारी, क्षेत्र विकास प्राधिकरण, कोल्हापूर.

११) सह संचालक, नगर रचना, अंमलबजावणी कक्ष / मुल्यांकन / पुणे / कोकण / नाशिक /नागपूर / औरंगाबाद / अमरावती विभाग

१२) कक्ष अधिकारी (नवि-२९), नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.

/- त्यांना विनंती करण्यात येते की, सदरचे निदेश विभागाच्या वेबसाईटवर प्रसिध्द करावेत.

१३) कक्ष अधिकारी, माहिती व तंत्रज्ञान विभाग, मंत्रालय, मुंबई.

/- त्यांना विनंती करण्यात येते की, सदरचे निदेश शासनाच्या वेबसाईटवर प्रसिध्द करावेत.

१४) अवर सचिव, नवि-११ / नवि-१३ / नवि-३०.

१५) कक्ष अधिकारी, नवि-९ / नवि-१२.

१६) निवडनस्ती (नवि-१३).

URBAN DEVELOPMENT DEPTT. सत्यमेव जयते MANTRALAYA, MUMBAI-32